जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९९२०८२७९

प्रेसनोट दिनांक ०७.०२.२०२५

## “ अटल गुन्हेगारास स्थानबध्द केले बाबत ”

उल्हासनगर पोलीस ठाणे अभिलेखावरील गुंड नामे विकास उर्फ पप्पा अशोक शिंदे, वय २८ वर्षे, रा.उल्हासनगर–२, याचे विरूध्द उल्हासनगर पोलीस ठाण्यात आपखुशीने दुखापत करणे, गंभीर दुखापत करणे, गैरकायदयाची मंडळी जमवुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, घरात घुसुन मारहाण करणे, घातक शस्त्र जवळ बाळगणे, नुकसान करणे, शिविगाळ व दमदाटी करणे, या सारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयामध्ये त्यास अटक होऊनही त्याच्या गुन्हयांना पायबंद बसत नसल्याने त्याचेवर मा.विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, उल्हासनगर विभाग येथे उल्हासनगर पोलीस स्टेशन मार्फत चॅप्टर केस क. १८/२०२२ २३/०५/२०२२ अन्वये सीआरपीसी कलम (ई)(ग) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने त्यास पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, उल्हासनगर यांचेकडील क्र.पोउआ/परि.४/उ.नगर/हद्दपार/केस नं ४९/आदेश/२३३२/२०२४, दि.१४.०३.२०२४ अन्वये नि.स्था.इ यास दिनांक.१६.०३.२०२४ पासून ठाणे जिल्हा. बृहन्मुंबई, मुंबई उपनगरे व रायगड जिल्हयातील कर्जत, पनवेल तालुका या भागाच्या महसूली हद्दीतून दोन (२) वर्षे कालावधी करीता हद्दपार करण्यात आले होते. सदर आदेशाचे त्याने उल्लघंन केल्याने त्याच्या विरूध्द उल्हासनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

तसेच सन २०२४ मध्ये नियोजित स्थानबध्द इसम याचे वर मारहाणीचे २ गुन्हे व सरकारी कामात अडथळा निर्माण करणेचा १ गुन्हा असे गुन्हे दाखल झाल्यानंतर त्यास महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे बाबत अधिनियम (एमपीडीए) सन १९८१ (सुधारणा १९९६) (सुधारणा १९०९) (सुधारणा २०१५) सह भारतीय संघटनेचे कलम २२ (५) यासह सदर कायदयाचे कलम ३ चे पोटकलम (२) अन्वये स्थानबध्द करणेबाबत मा.पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडील एमडीए आदेश क्रमांक टीसी/पीडी/डीओ/एमपीडीए –०१/२०२५, दिनांक ०६.०२.२०२५ अन्वये प्राप्त झाले असून, विकास उर्फ पप्पा अशोक शिंदे यास आज दिनांक ०७.०२.२०२५ रोजी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द करण्यात आले आहे. तसेच पोलीस ठाणे अभिलेखा वरील हद्दपार आरोपी याने पोलीस ठाणे हद्दीत येवुन दहशतीचे वातावरण तयार केल्यास त्याच्यावर वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली अशा प्रकारे कठोर स्थानबध्दतेची कारवाई करण्यात येईल.

सदरची कारवाई श्री.सचिन गोरे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर, श्री.अमोल कोळी, सहाय्यक पोलीस आयुक्त, उल्हासनगर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विष्णु ताम्हाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.चंद्रहार गोडसे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस पथक यांनी पार पाडले आहे.

.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर